
'आदिवासी भूषण पुरस्कार' निमित्त

# गौरव विशेषांक

सन २००५-०६

## आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे



धरतीची लेकरं आम्ही... धरतीची रक्षा करु
हातात हात घेऊन... राष्ट्राचा विकास करु!



'आदिवासी भूषण पुरस्कार' निमित्त

# गौरव विशेषांक

## सन २००५-२००६

आदिवासी भूषण पुरस्काराने गौरविण्यात येणारे मान्यवर

मा. कॉ. वाहरूजी सोनवणे

मा. ॲड्. मनोहरराव देशमुख

मा. श्री. पांडुरंगबाबा गांगड

दिनांक : रविवार, १८.०६.२००६ वेळ : दुपारी १२.०० वाजता

स्थळ : प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवडगाव, पुणे-४११०३३

आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे.

मंत्री
शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

मंत्री
महाराष्ट्र राज्य

दिनांक : २.६.२००६

# शुभेच्छा

आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे यांच्यावतीने प्रदान करण्यात येणाऱ्या आदिवासी भूषण पुरस्कार निमित्ताने श्री. वाहरू सोनवणे, नंदुरबार, ॲड्. मनोहरराव देशमुख, अहमदनगर व श्री. पांडुरंगबाबा गांगड, नाशिक यांच्यावर आदिवासी भूषण पुरस्कार प्रदान कार्यक्रमाचे निमित्ताने कार्यगौरव विशेषांक प्रसिद्ध करीत आहे हे समजून आनंद वाटला.

महाराष्ट्राच्या दुर्गम आणि डोंगराळ भागातील आदिवासींना विकासाची दारे खुली करण्यात तसेच शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नती व्हावी व त्यांचा मागासलेपणा दूर होऊन त्यांनी राष्ट्रीय प्रवाहात एकरूप व्हावे यासाठी आदिवासी भूषण पुरस्कारप्राप्त व्यक्तींनी प्रसिद्धीच्या झोतात न रहाता अबोल पद्धतीने प्रशंसनीय कार्य केले आहे. आदिवासी समाजासाठी सातत्याने झटून व शासनाने आखलेल्या योजनांचा आदिवासी समाजाच्या तळागाळापर्यंतच्या लोकांना जास्तीत जास्त लाभ कसा होईल असा प्रयत्न केलेला आहे.

पुढील सर्व वेळ ते आदिवासींच्या उन्नतीकरिता घालवतील अशी माझी अपेक्षा आहे. मी त्यांना दीर्घायुष्य इच्छितो.

आदिवासी समाज कृती समितीतर्फे आदिवासी भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा उपक्रम निश्चितच अनुकरणीय आहे.

गौरव विशेषांकास माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

(प्रा. वसंत पुरके)

# आदिवासी भूषण पुरस्कार



मा. कॉम्रेड वाहरूजी सोनवणे

# आदिवासी भूषण पुरस्कार

## ॥ सन्मानपत्र ॥

### मा. कॉम्रेड वाहरूजी सोनवणे

नंदुरबार जिल्ह्याच्या शहादा तालुक्यातील श्रीखेड या अतिदुर्गम भागात व्यवस्थेने दरिद्री बनविलेल्या व मोलमजुरी करणाऱ्या आदिवासी कुटुंबात ६ ऑगस्ट १९५० रोजी आपण जन्माला आलात. ६ ऑगस्ट १९५० हा काही आपला खरा जन्मदिवस नाही असे आपण सांगता पण त्या 'खऱ्या' 'खोट्या' वाचून आपले काही अडले आहे का, नाही. श्रीखेडसारख्या गावात त्या वेळी प्रथम वर्ष कला शिकलेले आपण एकमेव तरुण होतात. साहजिकच, आपण नोकरी करावी असे वाटले असणार, परंतु आदिवासींचे नेते अंबरसिंग महाराजांनी आपल्याला चुचकारल्याने आपल्यातील धडाडीचा कार्यकर्ता जागा झाला.

कार्यकर्ता म्हटले की तारेवरची कसरत! मान, अपमान सारं काही आलं. पण या गोष्टींना पचवून ताठ मानेने आदिवासींचे अश्रू पुसायला आपण पुढे सरसावला. आदिवासींच्या वाड्यांवर भटकंती करताना आपण नुसती केविलवाणं जीणं जगणारी हाडा-मांसाची माणसेच पाहिली नाहीत, तर आपल्याही वाट्याला त्यातील सारं काही आलं. आपला प्रवास माघारी फिरण्याचा नसल्याने फाटक्या माणसांच्या चळवळीत आपण अधिकच रुतत गेलात. या चळवळीत कार्यरत असताना आपल्याला अनेकदा चटके आणि फटकेही बसले, त्यातूनच आपल्या मूकव्या झऱ्याला पाझर फुटले आणि अस्सल जातिवंत 'भिलोरी' बोलीतील कविता जन्माला आली.

आदिवासी बांधवांचे संघटन करताना, श्रम करणाऱ्यांना व घाम गाळणाऱ्यांना आपण मोठ्या शिताफीने एकत्र आणले. खरोखर ही बाब अविस्मरणीय कामगिरी म्हणावी लागेल. 'श्रमिक संघटना, शहादा' या संघटनेचे आपण खरेखुरे आधारस्तंभ म्हणून ओळखले जाता, तर 'श्रमिक मुक्ती दल'तील एक खंदा आणि लढवय्या शिपाई म्हणूनही आदिवासी बांधव आपल्याकडे पाहतात. संपूर्ण भारतीय समाजव्यवस्थेत आदिवासींचे होणारे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक शोषण आणि त्यांची अन्याय-अत्याचारांपासून मुक्तता हा आपल्या चिंतनाचा विषय असल्याने त्याचे प्रतिबिंब आपल्या काव्यात उतरणे साहजिकच आहे.

आपण जंगलातल्या पहाडी मुलखातल्या उघड्या-बोडक्या, लंगोटीवाल्या माणसाला मराठी जगतात आणल्याने आदिवासी साहित्य चळवळीतील ज्येष्ठ ख्यातनाम कवी व सामाजिक कार्यकर्ते म्हणून संपूर्ण भारतात परिचित झाला. आपल्या भिलोरी बोलीतील 'गोधड' काव्यसंग्रहाला 'कवी कुसुमाग्रज काव्यपुरस्कार' मिळाला त्या वेळी आदिवासी जनतेची छाती मोठ्या अभिमानाने फुगली होती. पाचवे आदिवासी साहित्य संमेलन, पालघर, जि. ठाणे, विद्रोही साहित्य संमेलन, कोल्हापूर, परिवर्तनवादी साहित्य संमेलन, भंडारा, या संमेलनांची अध्यक्षपदं आपल्याकडं चालून आली. एवढा मोठा दबदबा साहित्यसृष्टीत झाला आहे. आजवर आपण आदिवासींसाठी नव्हे तर 'आदिवासींसोबत' लढला आणि त्यांचे अनेक प्रश्न संघटनेच्या माध्यमातून सोडविले. 'यशस्वी कार्यकर्ता' आणि अस्सल 'भिलोरी कवी' ही दोन्ही बिरुदं सहसा कोणाच्या वाट्याला येत नसतात पण आपल्या ती आली आणि आपण आदिवासी साहित्याला वैभवाच्या शिखरावर पोहोचवलं, ही गोष्ट आदिवासींना निश्चितच भूषणावह आहे.

कॉ. सोनवणेसाहेब! आपण खरोखर हाडाचे कार्यकर्ते आहात, म्हणून तर आपण जंगल-जमीनग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आणि स्वास्थ्यासाठी अक्षरशः जीवाचं रान केलंत. अधिवेशने, चळवळी नि सत्याग्रह करून प्रश्न तर सोडविलेच शिवाय अनेकदा तुरुंगवासही भोगला, पण जिद्द सोडली नाही. आजही आदिवासींच्या अस्तित्वासाठी आणि आत्मसन्मानासाठी आपला लढा सुरूच आहे. 'आदिवासी' हाच आपल्या कार्याचा अखेरचा श्वास असेल असे आपण मोठ्या अभिमानाने सांगता. खरेच याला म्हणतात सच्चा कार्यकर्ता! आपल्या या उत्तुंग कार्याची दखल महाराष्ट्र शासनाने वेळीच घेतली असून 'आदिवासी सेवक' या राज्य पुरस्काराने आपल्याला गौरविण्यात आले आहे. पण कर्तव्यभावनेने आदिवासी समाज कृती समिति, महाराष्ट्र, पुणे आपणांस 'आदिवासी भूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करीत आहे. आपण या पुरस्काराचा व सन्मानपत्राचा स्वीकार करावा, ही विनंती.

| श्री. सीताराम जोशी | प्रा. एकनाथ बुरसे | श्री. सुदाम मराडे |
|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

# आदिवासी समाज कृती समितीने दिलेले आदिवासी भूषण पुरस्कार

१ला आदिवासी भूषण पुरस्कार - १९९९



कै. डॉ. गोविंद गारे

२रा आदिवासी भूषण पुरस्कार - २०००



कॉम्रेड नजुबाई गावीत

३रा आदिवासी भूषण पुरस्कार - २००१



श्री. काळूराम दोधडे

४था आदिवासी भूषण पुरस्कार - २००२



मा. श्री. मधुकरराव पिचड, माजी मंत्री-आदिवासी विकास

*हार्दिक शुभेच्छा!*

# पुणे शहर आदिवासी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, पुणे

५३/१ब, विनायकनगर, गणपती चौक, नवी सांगवी, पुणे-४११०२७

☎: २७२८५१६३

**संपूर्ण संगणकीकृत**

• कामकाज वेळ •

सोमवार ते शुक्रवार : दुपारी ४ ते सायं. ८

शनिवार व रविवार : स. ११ ते दु. ४

• आमची मुख्य उद्दिष्टे •

• ठेवी वाढविणे • सभासद वाढविणे • जास्तीतजास्त सभासदांना कर्ज वितरण करणे •
•जास्तीतजास्त सभासदांना सहभागी करून घेण्यासाठी विभागवार एक दिवस संस्थेचे कामकाज चालविणे•

• आकर्षक ठेव योजना - मुदत ठेव •

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ९० दिवस | ६.५% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५% |
| ९१ ते १८० दिवस | ७.५% |
| १ वर्ष ते २ वर्ष | १०.०% |
| २ वर्षापेक्षा जास्त | ११.०% |

• संचालक मंडळातर्फे •

सौ. रंजना मोरमारे, अध्यक्षा
श्री. निवृत्ती उतळे, उपाध्यक्ष
श्री. दुंदा मोरे, मानद सचिव

• संचालक सदस्य •

श्री. विजय डगळे
श्री. राजेंद्र पोटकुले
डॉ. पोपट जोशी
श्री. राजेंद्र रेंगडे
श्री. केशव चिमटे
श्री. मधुकर कोकणे
श्री. शांताराम मोईर
श्री. मुकुंद मोरमारे
श्री. योगेश साबळे
सौ. आशा दाते (महिला संचालक)